# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/४७/२०१४-१५/२४१ दिनांक : २१.११.२०१४

**<u>आदेश केस क्र.४७/१४-१५</u>**

श्री. दत्तात्रय रामचंद्र शिंदे, - अर्जदार
मु.पो. बोरगांव, ता. वाळवा, जि. सांगली

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय,सांगली.

२) कार्यकारी अभियंता, - विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर

३) उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय १, इस्लामपूर

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

## <u>न्याय निर्णय</u>

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. दत्तात्रय रामचंद्र शिंदे, गाहक क्रमांक २८४१४०२५७०५१, मु.पो. बोरगांव, ता. वाळवा, जि. सांगली यांच्यातर्फे त्यांचा मुलगा श्री. आनंदराव दत्तात्रय शिंदे यांनी प्रतिनिधी म्हणून 'अ ' फॉर्ममध्ये दि. ०२.०८.२०१४ रोजी मंचामध्ये तक्रार दाखल केली आहे.

मंचाने रितसर तक्रार दाखल करुन घेऊन दि. ०५.०९.२०१४ रोजी मंच कार्यालय, कोल्हापूर येथे सुनावणी घेतली. सुनावणीचीवेळी ग्राहक प्रतिनिधी श्री. आनंदराव शिंदे उपस्थित. वितरण कंपनीतर्फे सांगली मंडल कार्यालयाचे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर व उप कार्यकारी अभियंता, इस्लामपूर उप विभाग-१ हे उपस्थित होते.

क्ष नमुन्यातील तक्रार व त्यातील आदेश, ग्राहकाने दाखल केलेली तक्रार व त्यातील मजकूर, वि.प.ची त्याबाबतची भूमिका, तसेच सुनावणी दरम्यानची कथने व म्हणणे या आधारे ग्राहकाच्या तक्रारीचे सर्वसाधारण स्वरुप तसेच वि.प.ची त्या संदर्भातील भूमिका खालील प्रमाणे दिसून येते.

ग्राहकाच्या गाऱ्हाण्याचे स्वरुप

अर्जदार ग्राहक यांचे शेती वापरासंदर्भात वीज कनेक्शन आहे. सदर जोडणीवर वेळच्यावेळी योग्यप्रकारे बीले दिली नाहीत म्हणून ग्राहकाने मंचामध्ये तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीचा निर्णय मान्य नसलेने, ग्राहकाने मा. लोकपाल यांच्याकडे अपील अर्ज केला होता. सदर अपीलअर्जाच्या निकालाच्या अनुषंगाने मंचाने कृषि संजीवनी संदर्भात आदेश दिलेला आहे. त्याही संदर्भात मा. लोकपाल यांच्याकडे अपील केल्याचे दिसून येते. ग्राहकाने प्रतिनिधी मार्फत जी तक्रार दाखल केली आहे, त्यामध्ये वि.प.ने दि. ०८.०१.२०१४ ते दि. २२.०२.२०१४ या काळात विनाकारण वीज पुरवठा बंद केला व रिकनेक्शन चार्जेस भरल्यानंतर विद्युत प्रवाह चालू केला आहे. सदरची रु. १५०/- ही रक्कम व्याजासह परत मिळावी. मा. लोकपाल यांच्याकडे अपीलअर्ज प्रलंबित असतांनाही व तसे सांगूनही विद्युत पुरवठा खंडित केल्यामुळे झालेले पिकाचे नुकसान प्रति तास रु. ५०/- या प्रमाणे रु. ५४,५००/- तसेच दि. २५.०३.२०११ ते दि. २१.०५.२०१४ या कालावधीमध्ये अपीलदार यांची तक्रार चालू होती. अपिलदाराच्या बाजूने निर्णय झालेमुळे अपिलदार ग्राहक यांना प्रति आठवडा रु.१००/- या प्रमाणे १३९ आठवड्यांचे रु. १३,९००/- मिळावेत इ. मागण्या आपल्या निवेदनात नोंदविल्या आहेत. तसेच अंतर्गत कक्ष, सांगली यांनी दिलेल्या निर्णयातील सही करणार अधिकारी हे सुनावणीचेवेळी उपस्थित नव्हते असे असतांनासुध्दा निर्णयावर सदर संबंधित अधिकाऱ्यांच्या सह्या दिसून येतात. सबब त्यांचेवरही कायदेशीर कारवाई व्हावी, मु.पो. बोरगांव, ता. वाळवा येथील थकबाकीदार ग्राहकांची यादी मिळावी इ. मागण्या ग्राहकाने नोंदविल्या आहेत व अशाप्रकारचे ग्राहकाच्या गाऱ्हाण्याचे स्वरुप दिसून येते.

वितरण कंपनीची भूमिका

वितरण कंपनीने पत्र क्र. २७४८ दि. १९.०७.२०१४ तसेच पत्र क्र. ३१६० दि. २५.०८.२०१४ ने ग्राहकाच्या गाऱ्हाण्यातील मागण्यास फेटाळून अर्ज निकाली ठेवावा अशी विनंती मंचाला केली आहे. आपल्या वरील संदर्भिय पत्रात वि.प.ने असे नमूद केले आहे की, दि. ०५.११.२०१२ पासून ग्राहकाने वीज बील न भरल्यामुळे विद्युत कायदा २००३ कलम ५६ नुसार नोटीस देऊन १५ दिवसांनी विद्युत पुरवठा बंद केलेला आहे. तसेच मा. लोकपाल, मुंबई यांच्यापुढे प्रलंबित असलेली तक्रार अथवा कोल्हापूर मंचाने दिलेला निर्णय यामध्ये ग्राहकाचा विद्युत पुरवठा बंद करु नये असे आदेशात नमूद केलेले नाही . ग्राहकाचा विद्युत पुरवठा थकबाकी असल्यामुळेच खंडित केला आहे, त्याने पुनर्जोडणीची रक्कम भरल्यानंतर नियमानुसार त्यांचा विद्युत पुरवठा चालू केलेला आहे.

ग्राहकाने सदोष सेवा व मानसिक त्रास या संदर्भात जी नुकसान भरपाई मागितलेली आहे ती देणे कायद्यास धरुन नाही. तसेच कोल्हापूर मंचाने दिलेले निर्णय बील दुरुस्तीचे अथवा कृषि संजीवनी योजनेच्या लाभाचे त्याप्रमाणे बील दुरुस्त करुन दिलेले आहे. सबब ग्राहकाची तक्रार न्यायास धरुन नाही, म्हणून सदरची तक्रार निकाली ठेवावी असे वि.प.ने आपल्या अर्जात किंवा आपल्या मुद्देनिहाय अभिप्रायात नोंदविले आहे.

मुद्दा क्र. १ : वरील तक्रार निकाली ठेवणे योग्य होईल किंवा कसे ?
उत्तर : होय

मुद्दा क्र.२ : आदेश ?
उत्तर : अंतिम आदेशाप्रमाणे

## कारणमिमांसा

श्री. दत्तात्रय रामचंद्र शिंदे यांच्या वतीने त्यांचा मुलगा श्री. आनंदराव दत्तात्रय शिंदे यांनी मंचामध्ये तक्रार दाखल केल्याचे दिसून येते. एकाचवेळी सर्व मुद्दे नोंद करुन तक्रार चालविली असती तर मंचास न्यायनिर्णय करणे सुलभ झाले असते. तथापि, वेगवेगळे मुद्दे वेगवेगळ्या अर्जात उपस्थित करुन तक्रार केलेली दिसून येते. कोल्हापूर ग्राहक मंचाने दिलेल्या निर्णयाविरुध्द प्रथमतः मा. लोकपाल यांचेकडे केलेले अपील अर्ज, त्यावर मा. लोकपाल यांनी दिलेला निर्णय या आधारे मंचाने परत न्यायनिर्णय केला. त्याही निर्णयाला आव्हान देऊन परत नव्याने नवीन मुद्दे उपस्थित केल्याने मा. लोकपाल यांनी आपल्या दि. २१.०५.२०१४ चा आदेश क्र. १०२/१३/७४ मध्ये ग्राहकाचे अभिवेदन विचारांत घेता येणार नाही, तक्रार निकाली काढणेत येतआहे असे आदेश पारित केलेले दिसून येतात. ग्राहकाने प्रस्तुत प्रकरणी केलेली तक्रार हा त्याचाच एक भाग असल्याचे मंचाचे निदर्शनास आले आहे. प्रत्यक्षात ग्राहकाने दि. ०५.१२.२०११ पासून कोणत्याही प्रकारची रक्कम वि.प.कडे जमा केल्याचे दिसून येत नाही. उलटपक्षी, सदर कालावधीपासून निर्णय झाला नाही अगर बील दुरुस्त झाले नाही म्हणून वि.प.कडून नुकसान भरपाई मागणे हे उचित दिसत नाही. ग्राहकाने आपले तक्रारीचे हक्क शाबित ठेवून वि.प.कडे रकमेचा भरणा केला असता तर ते निश्चितच योग्य झाले असते. तथापि, वि.प.ने २०११ सालापासून २०१४ सालापर्यंत म्हणजे विद्युत पुरवठा खंडित होईपर्यंत ग्राहकाच्या बील भरण्याची वाट बघितलेली आहे. ग्राहकाने मागणी संपादित करण्यासाठी माहितीचा अधिकारापासून सर्व प्रकारे पत्र-व्यवहार करुन विनाकारण वेळ घालविलेला दिसून येतो. ग्राहकाने केलेली भरपाईची मागणी ही न्यायास धरुन नसल्याने फेटाळण्यात येत आहे व म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर ' होय ' असे नोंदविलेले आहे.

सर्व बाबींचा विचार करुन ग्राहकाची सदरची तक्रार निकाली काढणेत येत आहे.

मंच कार्यालयातील स्टेनोग्राफर दि.३१.०८.२०१४ रोजी सेवानिवृत्त झाले. दि. ०५.०९.२०१४ व ०६.०९.२०१४ रोजी इतरही तक्रारींची सुनावणी घेण्यात आली. प्रत्यक्षात स्टेनो कार्यालयात दि. ०८.१०.२०१४ पासून नियुक्त झाले. दरम्यानच्या काळात स्टेनो नसल्याने प्रस्तुत तक्रार २ महिने मुदतीत निकाली काढता आलेली नाही.

**आदेश**

१) कारणमिमांसेतील विवेचनाप्रमाणे सदरची तक्रार निकाली ठेवण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
( जी. सी. लेले )
सदस्य

दिनांक : ०१.११.२०१४

बी. जी. पवार, अध्यक्ष .. सही/-

जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.